स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२५–२६/२८०    दि. १५/०९/२०२५

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : राष्ट्रीय सेवा योजना स्थापन दिवस दि. २४ सप्टेंबर, २०२५ या दिवसाचे औचित्य साधून दि. २२ ते २९ सप्टेंबर २०२५ दरम्यान उपक्रम राबविण्याबाबत ...

संदर्भ : मा. राज्य संपर्क अधिकारी, रासेयो उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, महाराष्ट्र शासन यांचे रासेयो–२०२५/प्र.क्र.८५/रासेयो कक्ष,दि. ११ सप्टेंबर, २०२५ रोजीचे पत्र

महोदय,

मा. राज्य संपर्क अधिकारी, रासेयो उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या पत्रानुसार राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस दि. २४ सप्टेंबर २०२५ या दिवसाचे औचित्य साधून दि. २२ ते २९ सप्टेंबर २०२५ दरम्यान उपक्रम राबविण्याबाबत निर्देशित करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयामध्ये रासेयो स्वयंसेवकांमार्फत दि. २२ ते २९ सप्टेंबर २०२५ दरम्यान उपक्रम राबविण्याबाबतचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबत जोडले आहे. त्यानुसार आपल्या महाविद्यालयामध्ये उपक्रम राबविण्यात यावेत. सदर उपक्रम संपन्न झाल्यानंतर त्वरीत उपक्रमाचे फोटो, व्हिडीओ व अहवाल nss_student_list@pun.unipune.ac.in, nssmantralaya@gmail.com या मेलवर 'राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस २०२५' या विषयासह पाठवण्यात यावा. कळावे, ही विनंती.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबतः मा. राज्य संपर्क अधिकारी, रासेयो उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,**

एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.

ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र.०२२-२२६७९५६५

**क्रमांक: रासेयो-२०२५/प्र.क्र.८५/रासेयो कक्ष,** **दिनांक: ११ सप्टेंबर,२०२५.**

**प्रति,**

**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,**
**सर्व अकृषि/कृषि/अभिमत विद्यापीठे/संचालनालये(रासेयो संलग्नित),महाराष्ट्र राज्य.**

**विषय:**-राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस दिनांक २४ सप्टेंबर, २०२५ या दिवसाचे औचित्य साधून दिनांक २२ ते २९ सप्टेंबर, २०२५ हा आठवडा संपन्न करण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये आपणास असे सूचित करण्याबाबत मला निदेश आहे की, राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस दिनांक २४ सप्टेंबर, २०२५ या दिवसाचे औचित्य साधून दिनांक २२ ते २९ सप्टेंबर, २०२५ हा आठवडा संपन्न करण्याबाबत आपल्या स्तरावरून कार्यवाही करण्यात यावी. त्यानुषंगाने आठवडा संपन्न करण्याबाबतची मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे आहे:-

१. आठवड्याची सुरुवात दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ पासून करावी. दिनांक २२ सप्टेंबर रोजी भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानास स्मरण करून विद्यापीठातील महाविद्यालयातील / शाखेनुसार विद्यार्थीप्रिय प्राध्यापकांची निवड करुन त्यांचा सत्कार व व्याख्यान आयोजित करावे.

२. **निवडीचे निकष:-** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून त्यांच्या आवडीच्या प्राध्यापकांबाबत ५ ओळी त्यांच्या व्यक्तीमत्वाबद्दल लिहून बंद डब्यामध्ये टाकण्यात यावे. सदर डब्बा महाविद्यालयाचे संचालक/ प्राचार्य व रासेयो समिती सदस्य यांच्या समक्ष उघडून निवड करण्यात यावी. विद्यार्थीप्रिय प्राध्यापकांची निवड करावी.

**उद्देश:-**

रासेयो हे फक्त रासेयो स्वयंसेवकांपुरते मर्यादित न राहता महाविद्यालयातील सर्व विषयांच्या शाखेच्या / विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे तसेच कार्यक्रम अधिकाऱ्यांना महाविद्यालयातील इतर प्राध्यापकांचे सहकार्य मिळावे. सदर कार्यक्रम ६० मिनिटांमध्ये पुढीलप्रमाणे संपन्न व्हावा:-

| प्रस्तावना | स्वागत | मार्गदर्शन | समारोप | एकूण वेळ |
|---|---|---|---|---|
| १० मिनिटे | ५ मिनिटे | २५ मिनिटे + १५ मिनिटे अध्यक्षीय भाषण | ५ मिनिटे | ६० मिनिटे |

३. **दिनांक २३ सप्टेंबर, २०२५:-** दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांची १५०वी जयंती केंद्र शासनाच्या वतीने संपन्न करण्याचे आयोजिले आहे. त्याबाबत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांनी भारताची अखंडता कायम ठेवण्याच्या दृष्टिकोनातून केलेल्या कार्याबद्दल (Operation Polo) माहिती देण्यात यावी. तसेच त्यांच्या कणखर नेतृत्वाची विद्यार्थ्यांना

ओळख व्हावी. या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. जेणेकरून केंद्र शासन, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयातर्फे जी प्रश्नमंजूषा आयोजित करण्यात आलेली आहे, त्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील मोठ्या संख्येंनी स्वयंसेवक सहभागी होतील. त्याचप्रमाणे Article ३७०, कारगील विजय दिवस, Operation Sindoor याबाबत चित्रफितीव्दारे माहिती द्यावी. जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागेल.

| **प्रस्तावना** | **स्वागत** | **मार्गदर्शन** | **चित्रफित दाखविणे** | **समारोप** | **एकूण वेळ** |
|---|---|---|---|---|---|
| १० मिनिटे | ५ मिनिटे | ४० मिनिटे + १५ मिनिटे अध्यक्षीय भाषण | १५ मिनिटे | ५ मिनिटे | १.३० मिनिटे |

४. **दिनांक २४ सप्टेंबर, २०२५:- राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस** साजरा करणे.
**उपक्रम :** महाविद्यालयामध्ये विविध उपक्रम राबवावेत. जसे. स्वच्छता मोहिम, वृक्षारोपण, वृक्ष दिंडी, जलसंवर्धन, प्लास्टीक निर्मुलीकरण, कागदांचा दुरूपयोग इत्यादी विषयांबाबत जनजागृती करण्यात यावी.

५. **दिनांक २५ सप्टेंबर, २०२५:- अंत्योदय दिवस - पंडीत दीनदयाळ उपाध्याय** यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस साजरा करण्यात यावा.
**उपक्रम:** समाजातील सर्वांत गरीब, दूर्बल किंवा मागासलेल्या लोकांची उन्नती व कल्याण करणे यासंदर्भात पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांनी केलेल्या कार्याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देणे, पोष्टर, निबंधलेखन स्पर्धा, चर्चा सत्रे /भाषणे इत्यादी उपक्रम राबवावे. महाराष्ट्र शासनाने या घटकातील लोकांसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी विविध योजनांबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देऊन समाजापर्यंत पोहचविणे.

६. **दिनांक २६ सप्टेंबर, २०२५:- जागतिक पर्यावरण आरोग्य दिवस-** महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये व समाजामध्ये पर्यावरण व त्याचे मानवी जीवनातील महत्त्व याबाबत जनजागृती करण्यात यावी.
**उपक्रम:** प्लास्टीक निर्मूलन, एक पेड माँ के नाम यांसारख्या उपक्रमांबाबत आजू-बाजूच्या परीसरामध्ये रॅलीव्दारे जनजागृती करण्यात यावी.

७. **दिनांक २७ सप्टेंबर, २०२५:- विश्व पर्यटन दिवस-** छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ गडकिल्ल्यांचा UNESCO च्या यादीमध्ये समावेश करण्यात आल्यामुळे महाराजांच्या कार्याबद्दल व त्यांनी निर्माण केलेल्या हिंदवी स्वराज्याबाबतचा प्रेरणादायी इतिहास विद्यार्थ्यांना कळावा याकरिता
**उपक्रम:** व्याख्यान आयोजित करावे, गडकिल्ल्यांच्या चित्रफिती दाखविण्यात यावे, सहली इत्यादींसारखे उपक्रम राबवावेत.

८. **दिनांक २८ सप्टेंबर, २०२५:- शहीद भगतसिंग जयंती**
**उपक्रम:** शहीद भगतसिंग जयंतीच्या निमित्याने त्यांच्या कार्याबाबत युवकांमध्ये देशभक्ती, साहस आणि सामाजिक जबाबदारीची जाणिव निर्माण व्हावी तसेच त्यांच्या आदर्शाचे स्मरण करण्यासाठी हा दिवस त्यांच्या जीवनावर व्याख्यान आयोजित करून साजरा करण्यात यावा.

९. **दिनांक २९ सप्टेंबर, २०२५:- जागतिक / विश्व हृदय दिवस**
**उपक्रम:** आरोग्य / पोषण-आहार/ सिकलसेल/ ॲनिमिया / संसर्गाने न होणारे आजार जसे: हृदयरोग, मधूमेह, उच्च रक्तदाब इत्यादींबाबत कार्यशाळा/ निबंध/ कविता/ पोस्टर स्पर्धा, पथनाट्य तसेच आरोग्य तपासणी शिबिर, रक्तदान/ रॅली यांसारखे उपक्रम राबवावेत.

**२.** तरी उपरोक्त दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने राबविण्यात आलेला राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस दिनांक २२ ते २९ सप्टेंबर, २०२५ हा आठवडा संपन्न झाल्याबाबतचा सांख्यिकीय अहवाल सॉफ्ट कॉपीमध्ये तसेच हार्ड कॉपीमध्ये शासनास (रासेयो कक्ष) दिनांक १५ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत सादर करण्यात यावा.

आपला,

(डॉ.मिलिंद काळे)
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

**प्रत माहितीस्तव सादर:-**

१. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा.अप्पर मुख्य सचिव (उ. व तं. शि.) यांचे स्वीय्य सहायक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. सर्व सह सचिव / उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४. निवडनस्ती रासेयो कक्ष.